**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक :- ३४३८/२०१३
सुनावणी दिनांक :- १०/१२/२०१४
निर्णय दिनांक :- १०/१२/२०१४

१ श्री.दिलीप रामचंद्र बेहेडे,
रा.दत्तकॉलनी, मु.पो.ता.एरंडोल,
जि.जळगांव.

अपिलार्थी प्रतिनिधी उपस्थित

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
आर.टी.काबरे विद्यालय एरंडोल,
ता.एरंडोल, जि.जळगांव.

: प्रतिवादी प्रतिनिधी उपस्थित

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद जळगांव,
ता.जि.जळगांव.

प्रतिनिधी उपस्थित

**निर्णय**

प्रस्तुत प्रकरणात अपिलकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक यांच्याकडे दिनांक २६/०९/२०१३ रोजी द्वितीय अपील दाखल केले आहे. अपिलकर्ता व उत्तरवादी यांना नाशिक आयोगाच्या कार्यालयातून दिनांक १४/११/२०१४ रोजी नोटीस काढून दिनांक १०/१२/२०१४ रोजी अपिलाच्या सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते.

आजच्या सुनावणीस अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी श्री.सुनिल मुरलीधर मानुधने हजर आहेत. त्याचप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांच्या वतीने ॲड.धर्मेंद्र देविदास माळी हजर आहेत. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.जळगांव यांचे प्रतिनिधी शिक्षण विस्तार अधिकारी श्री.बी.डी.धाडी हजर आहेत.

अपिलकर्ता यांचे प्रतिनिधी तसेच जन माहिती अधिकारी यांचे वकील आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधींचे म्हणणे ऐकुन घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणात असे दिसुन येते की, अपिलकर्ता यांनी दिनांक २६/०६/२०१३ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीच्या

अधिकाराखाली अर्ज सादर करुन जानेवारी १९९१ ते जानेवारी १९९७ या कालावधीची श्री.महेश माणकचंद राठी यांची लिपीक या पदावर नेमणुक मान्यतेसाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद जळगांव यांना पाठविलेल्या प्रस्तावाच्या कागदपत्रांची मागणी केली होती. त्याला अनुसरुन आजच्या सुनावणीस हजर असलेले जन माहिती अधिकारी यांचे वकील श्री.माळी यांनी आयोगापुढे असे नमुद केले की, अपिलकर्त्याने सदरच्या माहितीच्या अर्जात मागितलेली माहिती सन १९९१ ते १९९७ म्हणजेच सुमारे १७ वर्षांपुर्वीच्या कालावधीची असल्यामुळे सदरचा माहितीचा शोध घेण्याचे काम जन माहिती अधिकारी यांनी सुरु केले. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास दिनांक २६/०७/२०१३ च्या पत्राने असे कळविले की, आपण मागितलेली माहिती जास्त कालावधीची असल्याने प्रस्तावाची कागदपत्रे शोधण्याचे काम सुरु आहे. प्रस्ताव मिळाल्यानंतर आपणांस सत्यप्रती पाठविण्यात येतील. तसेच शिक्षणाधिकारी यांचेकडून श्री.राठी यांना लिपीक म्हणून नेमणुकीच्या मान्यतेची सत्यप्रत मात्र त्यांनी अपिलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. त्यानंतर अपिलकर्त्याने प्रथम अपिल शिक्षणाधिकारी यांच्याकडे दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलाची सुनावणी दिनांक २७/०८/२०१३ रोजी घेतली आणि प्रथम अपिलाचा निर्णय निर्गमित करुन अपिलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले. प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास दिनांक १३/०९/२०१३ च्या पत्राने आणि दिनांक १०/१०/२०१३ च्या पत्राने त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दिली. सदरची माहिती अपिलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपिलकर्त्याच्या प्रतिनिधींनी मान्य केले. परंतु सदरची माहिती अपुर्ण असल्याचे अपिलकर्त्याच्या प्रतिनिधींचे म्हणणे आहे. मात्र याबाबत जन माहिती अधिकारी यांचे वकील श्री.माळी यांनी आयोगापुढे नमुद केले की, अपिलकर्त्याने मागितलेली माहिती ही सुमारे १७ वर्षांपुर्वीच्या कालावधीची आहे. म्हणून संस्थेकडे अभिलेख स्वरुपात उपलब्ध असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास दिलेली आहे.

म्हणून प्रस्तुत प्रकरणात असे दिसुन येते की, अपिलकर्ता यांच्या दिनांक २६/०६/२०१३ च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलकर्त्यास प्रथमतः दिनांक २६/०७/२०१३ च्या पत्राने माहितीची वस्तुस्थिती कळविलेली आहे. त्यानंतर प्रथम अपिलाच्या निर्णयाला अनुसरुन दिनांक १३/०९/२०१३ च्या पत्राने आणि दिनांक १०/१०/२०१३ च्या पत्राने अपिलकर्त्यास माहिती दिलेली आहे. परंतु सदरची माहिती अपुर्ण असल्याचे अपिलकर्त्याच्या प्रतिनिधींचे म्हणणे असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाकडे सद्यस्थितीत उपलब्ध असलेले मुळ रेकॉर्ड अपिलकर्त्यास निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देणे योग्य होईल आणि निरीक्षणानंतर अपिलकर्त्यास

हवी असल्यास ती देखील अपिलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपिलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांना पुर्वसूचना देवुन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी माहितीचे निरीक्षण करण्यासाठी त्यांच्या कार्यालयात हजर रहावे आणि अपिलकर्ता माहितीचे निरीक्षण करण्यासाठी हजर झाल्यानंतर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपिलकर्त्यास त्यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात जे मुळ रेकॉर्ड त्यांच्य कार्यालयात उपलब्ध आहे ते निरीक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावे आणि निरीक्षणानंतर अपिलकर्त्यास पुन्हा माहिती हवी असल्यास ती मुख्याध्यापकांनी त्वरीत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

२) वरील निर्देशांसह सदरचे अपिल निकाली काढण्यात येत आहे.

**स्थळ : नाशिक**
**दिनांक : १०/१२/२०१४**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ नाशिक.**

प्रत,

१. श्री.दिलीप रामचंद्र बेहेडे, रा.दत्तकॉलनी, मु.पो.ता.एरंडोल, जि.जळगांव.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, आर.टी.काबरे विद्यालय एरंडोल, ता.एरंडोल, जि.जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी.

३. प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद जळगांव, ता.जि.जळगांव यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.